# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# कोयना अकॅडमीचे जेईई-मेन परीक्षेतील यश कौतुकास्पद

## विलासराव क्षीरसागर यांचे उद्गार, अकॅडमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा श्रीराम पतसंस्थेच्या वतीने सत्कार

पाटण
वार्ताहर

सामाजिक क्षेत्रात कार्य करणारे विविध व्यक्ती, संस्था तसेच शाळा व गुणवंत विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणाऱ्या श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था व श्रीराम सेवा संस्थेने सामाजिक बांधिलकीतून मागील ५९ वर्षांपासून सामाजिक उत्तरदायित्वाची परंपरा कायम जपली आहे. उच्च शिक्षणासाठी संस्था विद्यार्थ्यांच्या पाठीशी सदैव राहील. कोयना अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी देशात अवघड समजल्या जाणाऱ्या जेईई–मेन परीक्षेत मिळवलेले यश कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ संचालक विलासराव क्षीरसागर यांनी केले.



**पाटण : श्रीराम नागरी पतसंस्था तसेच श्रीराम सेवा संस्थेच्या वतीने विद्यार्थी व पालकांचा सत्कार करताना हिंदुराव सुतार, बजरंग प्रभाळे, विलासराव क्षीरसागर, दीपकसिंह पाटणकर, संचालक व मान्यवर.**

येथील श्रीराम पतसंस्था तसेच श्रीराम सेवा संस्थेच्या वतीने जेईई–मेन परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. पतसंस्थेचे अध्यक्ष हिंदुराव सुतार, उपाध्यक्ष बजरंग प्रभाळे, दीपकसिंह पाटणकर, ज्योती मोरे, संचालक दीपक खांडके, संचालिका रुपाली अग्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्ष हिंदुराव सुतार यांच्या हस्ते चेतन मोरे, ओंकार कदम, अथर्व राऊत, निखिल जाईगडे, सोहन सूर्यवंशी या विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दीपकसिंह पाटणकर, नगरसेवक संजय इंगवले यांनी कोयना एज्युकेशन सोसायटी पाटणसारख्या ग्रामीण भागात कोयना अकॅडमीच्या माध्यमातून शैक्षणिक कायापालट करीत असल्याचे सांगून यशस्वी विद्यार्थी तसेच पालकांना शुभेच्छा दिल्या. पालकांच्या वतीने माजी उपसरपंच चंद्रकांत मोरे व सुनील कदम यांनी मनोगत व्यक्त केले.

दीपकसिंह पाटणकर यांनी प्रास्ताविक, बजरंग प्रभाळे यांनी आभार मानले. यावेळी संचालक राजेंद्र ऐर, किशोर गुरसाळे, आनंदराव संकपाळ, व्यवस्थापक लहू माने, अनिल भोसले, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश जाधव, नामदेव कुंभार, संचालक मंडळ, सर्व शाखाप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.